महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७ भाग-१/E-८१४२८३/ पोल-३, दि. २२/०४/२०२६.

**विषय** :- ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लगार यांना मुदतवाढ देणेबाबत.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७ भाग-१/E-८१४२८३/ पोल-३,, दि. २२/०४/२०२६. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४२२१८१३१८४२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 23-04-2026 14:40:43

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १७

प्रत,
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. : सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/E-814283/पोल-३
गृह विभाग, दुसरा मजला,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२.४.२०२६.

**वाचा :-**

१) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH),दि.०१.०७.२०१४, दि.१९.०७.२०१७, दि.०९.१०.२०१७, दि.२०.०३.२०१८, दि.०९.०५.२०१९, दि.२४.४.२०२३, व दि.५.१०.२०२३.
२) शासन निर्णय क्र.गृह विभाग क्र.सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.५.१.२०२४
३) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.५.७.२०२३, दि.९.१०.२०२३.
४) शासन पत्र गृह विभाग क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.६.२.२०२४ व दि.१७.५.२०२४
५) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांचे पत्र क्र. पोमसं/१७/ठाणे शहर CCTV प्रकल्प/२८/२०२१, दि.१६.१.२०२५
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३,दि.२५.७.२०२४.
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.७.४.२०२५.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३,दि.१४.७.२०२५.
९) शासन निर्णय गृह विभाग क्र. : सीसीटी ०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/E-८१४२८३/पोल-३, दि.४.२.२०२५
१०) शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान विभाग क्र. : आयटी-२०२६/प्र.क्र.७२/मातं, दि.१.४.२०२६.

**प्रस्तावना :-**

मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दि.२४.७.२०११ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार मुंबई शहर व राज्यात इतरत्र सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय प्रक्रीया सुलभ करण्यासाठी दि.२७.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली “उच्चस्तरीय शक्तीप्रदत्त समिती” (High Power Committee) स्थापन करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये सुरक्षा विषयक उपाययोजना करण्याकरिता आवश्यक ते सर्व निर्णय घेण्यासाठी सदर समितीला प्राधिकृत करण्यात आले. तथापि, तत्कालीन मुख्य सचिव यांच्या सुचनेनुसार गृह विभाग शासन निर्णय दि.४.८.२०१७ अन्वये गृह विभागातील विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीत एकसुत्रता राहावी म्हणून विविध शहरात सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतचा विषय अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील शहरांमध्ये नागरीकीकरणामुळे, औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, गुन्ह्यांमध्ये वाढ होत असलेली वाढ, यांचा विचार करुन “सुरक्षित शहर” ही संकल्पना राबविताना “सीसीटीव्ही यंत्रणा” बसविणे ही बाब महत्वाची ठरते. राज्यातील शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्री व निधी उपलब्धता विचारात घेऊन गृह विभागाने प्राधान्यक्रम धोरणाप्रमाणे ठाणे शहराचा समावेश केला आहे.

३. “ठाणे पोलीस आयुक्तालयाने दि.३०.९.२०२४ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात वाढीव एकूण ६०५१ सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या रु.५७५,८७,८१,३६२/- (जीएसटीसह) खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.९.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली.

४. ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाची प्रकल्प अंमलबजावणी व तद्नंतर Go-Live Phase चे काम प्रगतीपथावर सुरु आहे. ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी “प्रकल्प सल्लागारांच्या नियुक्ती / मुदतवाढी बाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

| क्र | प्रकल्प सल्लागारांचा तपशील | उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेस अनुलक्षून नियुक्ती / मुदतवाढीचे शासन निर्णयाचा दिनांक | नियुक्ती / मुदतवाढीचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून पीडब्ल्युसी कंपनीची निवड करण्यात आली. | शासन पत्र क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.६.२.२०२४ | सल्लागारांची संख्या व माईलस्टोनच्या कालावधीबाबत HPC मध्ये निर्णय घेण्यात येईल असे ठरले. |
| २ | ठाणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या आरएफपी व निविदा प्रक्रीयाकरिता १ प्रमुख सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व २ सहयोगी सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली. | शासन पत्र क्र.सीसीटी-०७२२/प्र.क्र.८७/पोल-३, दि.१७.५.२०२४ | २० Man-Month तत्वावर सदर सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली. |
| ३ | ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या Project Implementation Phase & Go-Live Phase या कालावधीसाठी दि.३०.९.२०२४ च्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार १ प्रमुख सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व २ सहयोगी सल्लागार यांना दि.१६.१०.२०२४ ते १५.१.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली. | शासन निर्णय क्र.सीसीटी०७२२/प्र.क्र.८७/भाग-१/E-८१४२८३/पोल-३, दि.४.२.२०२५ | १ प्रमुख सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व २ सहयोगी सल्लागार यांना दि.१६.१०.२०२४ ते १५.१.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली. |
| ४ | पोलीस महानिरीक्षक (नि. व स.) यांच्या दि. २५.३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये दि.२३.१.२०२६ रोजीच्या HPC मध्ये झालेल्या निर्णयानुसार “ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या १ प्रमुख | | |

| क्र | प्रकल्प सल्लागारांचा तपशील | उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेस अनुलक्षून नियुक्ती / मुदतवाढीचे शासन निर्णयाचा दिनांक | नियुक्ती / मुदतवाढीचा कालावधी |
|---|---|---|---|
| | सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व २ सहयोगी सल्लागार यांना दि.१६.१.२०२६ ते दि.१५.१.२०२७ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात आलेले आहे. | | |

५. पोलीस महानिरीक्षक (नि. व स.) यांच्या दि.२५.३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रकल्प सल्लागारांच्या मुदतवाढीच्या प्रस्तावासंदर्भात नमूद करण्यात येते की, दि.२३.१.२०२६ रोजीच्या HPC मध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

1) *The HPC approved the extension of M/s. PwC Pvt. Ltd. for a period of one year, from 16th January 2026 to 15th January 2027, with the existing team composition of five consultants (1 Principal Consultant, 1 Senior Consultant, 1 Consultant, and 2 Associate Consultants), in accordance with the DIT empanelment GR dated 05th October 2023. Any further amendments, if required, shall be made to ensure uninterrupted project monitoring.*
2) *The Home Department, GoM to issue the extension GR in line with the HPC decision.*

वरील निर्णयास अनुसरुन पोलीस महानिरीक्षक (नि. व स.) यांनी त्यांच्या दि. २५.३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये “ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या १ प्रमुख सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व २ सहयोगी सल्लागार यांना दि.१६.१.२०२६ ते दि.१५.१.२०२७ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याऐवजी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.१.४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार दि.१६.१.२०२६ ते दि.३०.४.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यास मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

अ.मु.स.(गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दि.२३.१.२०२६ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती (HPC) च्या बैठकीमध्ये झालेला निर्णय व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.१.४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन “ठाणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या १ प्रमुख सल्लागार, १ वरिष्ठ सल्लागार, १ सल्लागार व २ सहयोगी सल्लागार यांना दि.१६.१.२०२६ ते दि.३०.४.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

६. उपरोक्त प्रस्तावित खर्च हा “मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत १३-कार्यालयीन खर्च” या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा,व तो त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १,२,३ (Integration), ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबतचा प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.९.४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली असून सदर प्रकल्पांचा निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त,ठाणे यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून तसेच त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम,१९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार तसेच संदर्भ क्र.५ नुसार वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि.७.४.२०२५ व तदनंतर १४.७.२०२५ अन्वये दिलेल्या सुचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२२१८१३१८४२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.04.22 18:15:32 +05'30'

( रा. ता. भालवणे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, ठाणे.
३. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.

**प्रत,**

१. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. कार्यासन अधिकारी (व्यय-७ / विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती / पोल-३.